# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/५९
Telephone No. : 020-25621156/57/59
ईमेल / Email : approval@unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
संकेतस्थळ / Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. २१८ / २०२४

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य / संचालक यांना शैक्षणिक विभाग (संलग्नता) यांचे पत्र क्र. सीए/१३७२, दि. २३/०८/२०२२ अन्वये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये नाव, पदनाम, ई—मेल आयडी, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल नंबर, प्राचार्य / संचालकांचा दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक, इत्यादी माहिती अद्ययावत केलेली नसल्याने संपर्क होत नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. तसेच सदर संपूर्ण माहिती अचूक व अद्ययावत करणेबाबत वारंवार कळविण्यात आलेले आहे.

विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालये / परिसंस्थेमध्ये विहित पद्धतीचा अवलंब करून अथवा निवड समितीद्वारे नेमणूक करण्यात आलेल्या प्राचार्य / संचालक / अध्यापकांना विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी / परिसंस्थांनी विद्यापीठ संकेतस्थळावरील त्यांच्या महाविद्यालयांच्या / परिसंस्थेच्या प्रोफाईलमध्ये सदरच्या मान्यतेची माहिती अचूक भरणे व अद्ययावत करणे आवश्यक आहे. तथापि, काही महाविद्यालयांनी / परिसंस्थांनी प्रोफाईलमध्ये अद्यापही सदर माहिती अद्ययावत केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. एवढेच नव्हेतर काही महाविद्यालयांनी / परिसंस्थांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये विद्यापीठ मान्यता कालावधी संपलेल्या, संबंधित महाविद्यालयातून बदली झालेल्या, सेवानिवृत्त असलेल्या / कार्यरत नसलेल्या अध्यापकांची नावेही वगळल्याचे दिसून येत नाही.

सदर महाविद्यालयातील / परिसंस्थेतील प्रोफाईल मधील प्राचार्य / संचालक / अध्यापकांची माहिती तसेच त्यांच्या विषयासंदर्भातील माहिती महाराष्ट्र शासनाच्या विविध मागणीनुसार सादर करावी लागते.

महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्रोफाईल मधील प्राचार्य / संचालक / अध्यापकांची माहिती अद्ययावत करण्याबाबत यापूर्वी परिपत्रक क्र ४६३ / २०२४ दि. ५ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते.

तरी, या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य / संचालक यांना पुन:श्च एकदा कळविण्यात येते की, विद्यापीठाकडून ज्या अध्यापकांना शिक्षक मान्यता मिळालेल्या आहेत अशाच मान्यताप्राप्त प्राचार्य / संचालक / अध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रत्येक वर्षी शैक्षणिक सत्रापूर्वी अद्ययावत करण्यात यावी. तसे न केल्यास शासन पातळीवरील उत्तरदायित्वासाठी ते स्वत: जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

तसेच जे प्राचार्य / संचालक / अध्यापक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असतील किंवा ज्या प्राचार्य / संचालक / अध्यापकांच्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये बदल झालेला असेल तसेच अशा विविध कारणाने सदर माहितीमध्ये बदल झाला असेल तर ती माहिती तात्काळ अद्ययावत करणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

सर्व संबंधित महाविद्यालयांचे / मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रकातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जा. क्र. सीसीओ / ४४४४ )
दिनांक: ०९ सप्टेंबर, २०२४ )

9/9/2024

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

प्रत :

मा. प्राचार्य / संचालक, सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था